दूरध्वनी क्र. ०२०/२६३३३७४३
Email ID-tes.trti-mh@nic.in

महाराष्ट्र शासन
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
२८, क्वीन्स गार्डन, पुणे-४११००१

Website-
www.trti.maharashtra.gov.in

आसंप्रसं/संशोधन २०२६/प्र.क्र. /का.४(सं)/ ५४८१ दिनांक ३०/१०/२०२६

प्रति,

१. मान्यताप्राप्त शासकीय विद्यापीठ, महाराष्ट्र
२. शासन मान्यताप्राप्त संशोधन संस्था, महाराष्ट्र

विषय: प्रस्तावित विविध विषयावर नव्याने संशोधन प्रस्ताव सादर करणेबाबत.

संदर्भ: १) माननीय सचिव आदिवासी विकास विभाग मुंबई यांचे अध्यक्ष खाली दिनांक ०९/०३/२०२६ रोजी आयोजित नियमाक मंडळाच्या ९ व्या बैठकीचे इतिवृत्त
२) संशोधन परिषद इतिवृत्त मान्यता दिनांक: १३/०८/२०२६

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयांवर मा. सचिव आदिवासी विकास विभाग, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०९/०३ २०२६ रोजी आयोजित नियामक मंडळाच्या ९ व्या बैठकीमध्ये 'संशोधन संवर्धन व विकास योजना प्रभाव मूल्यांकन' या घटकाकरिता तपशीलवार अंदाजपत्रक व प्रस्ताव सादर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

त्यानुसार महाराष्ट्रातील ३८ विद्यापीठाद्वारे प्रस्ताव मागविण्यात आले. वरील विषयावर महाराष्ट्रातील १० विद्यापीठामधील प्राध्यापकांचे एकूण ६२ प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. संदर्भ क्रमांक २ नुसार सदर प्रस्तावावर या कार्यालयाच्या संशोधन परिषदेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. एकाच विषयावर सादर करण्यात आलेल्या विविध प्रस्तावामधील कामाचे स्वरूप, कार्यक्षेत्र, खर्चाची रक्कम, क्षेत्र कामाची व्याप्ती, जिल्हे व नमुना आकार (Sample Size) वेगवेगळे आहेत. त्यामुळे सदर प्रस्तावांचे शास्त्रीय दृष्टिकोनातून मूल्यांकन करणे शक्य नाही. विषय निहाय संकल्पना पत्रानुसार पुन्हा नव्याने सविस्तर प्रस्ताव आमंत्रित करावे असे संशोधन परिषदेने सुचविले आहे. त्याअनुषंगाने सदर विषयास प्रशासकीय मान्यता आणि प्रकल्प मार्गदर्शक सूचना यांना मा. आयुक्त यांची मान्यता प्राप्त आहे.

अनु. क्र.	प्रस्तावित संशोधन विषयाचे नाव
१	महाराष्ट्र राज्याच्या आदिवासी क्षेत्रातील आदिवासी तरुणांमध्ये (१८ ते ४५ वयोगट) स्थानिक रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधीचे विश्लेषण
२	महाराष्ट्र राज्याच्या आदिवासी क्षेत्रातील पर्यटनाचे विकासात्मक शास्त्रीय अध्ययन
३	महाराष्ट्र राज्यातील आदिवासी महिला समस्या व गरजांबाबत सर्वसमावेशक शास्त्रीय अध्ययन

त्याअनुषंगाने मान्यताप्राप्त शासकीय विद्यापीठाद्वारे आणि शासन मान्यताप्राप्त संशोधन संस्थांद्वारे पूर्वी प्रस्ताव सादर केले असले तरी वरील विषयाच्या अनुषंगाने नव्याने अंदाजपत्रकासह सविस्तर संशोधन प्रस्ताव दिनांक ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत सादर करावे ही विनंती.

(निलेश सागर, भा.प्र.से.)
आयुक्त
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

सहपत्र: वरील विषयाच्या 'प्रकल्प मार्गदर्शक सूचना'

प्रकल्प मार्गदर्शक सूचना

संशोधन विषय	**महाराष्ट्र राज्याच्या आदिवासी क्षेत्रातील आदिवासी तरुणांमध्ये (१८ ते ४५ वयोगट) स्थानिक रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधीचे विश्लेषण**
पार्श्वभूमी:	महाराष्ट्र राज्याच्या एकूण आदिवासी लोकसंख्येपैकी ५० टक्के पेक्षा अधिक लोकसंख्या TSP/OTSP/MADA/MiniMADA या आदिवासी क्षेत्राची आहे. सदर आदिवासी क्षेत्र सामाजिक, आर्थिक व भौगोलिकदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण असून येथे मोठ्या प्रमाणात वनक्षेत्र, वनउपज, खनिज संसाधने, पर्यटन स्थळे, शेती, औद्योगिक क्षेत्र, सहकारी संस्था, साखर कारखाने, शैक्षणिक संस्था, जलसाठे अशी विविध संसाधने प्रथमदर्शनी निदर्शनास येतात. यावर आधारित रोजगाराच्या संधी उपलब्ध असणे अथवा होण्याची शक्यता असू शकते. तरी देखील सदर आदिवासी क्षेत्रातून मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होताना दिसून येते. या स्थलांतरास प्रतिबंध होण्यासाठी व्यापक स्वरूपात स्थानिक रोजगार निर्मितीची आवश्यकता आहे. त्याचबरोबर रोजगार क्षमता/पात्रताधारक आदिवासी क्षेत्रातील/स्थानिक आदिवासी बांधवांसाठी बाह्य क्षेत्रात रोजगार संधी शोधण्याची आवश्यकता आहे. आदिवासी क्षेत्रातील आदिवासी युवक/तरुण वर्ग हा कार्यप्रवण वयोगट असल्याने राज्याच्या विकासासाठी महत्त्वाचा मानवी संसाधन घटक आहे. तथापि, आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यांच्यापुढे शिक्षण, कौशल्य, रोजगार, बाजारपेठ, वित्तीय सहाय्य, पायाभूत सुविधा आणि स्थानिक संसाधनांचा प्रभावी वापर या बाबींमध्ये अनेक आव्हाने असल्यामुळे रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधींचा अपेक्षित विकास झालेला नाही. याकरिता रोजगार, स्वयंरोजगार केंद्रित संशोधनाची आवश्यकता आहे. या संशोधनात संस्थेने १८ ते ४५ वर्ष या कार्यप्रवण वयोगटास विशेष प्राधान्य देणे अपेक्षित आहे. या संशोधनातून आदिवासी युवकांच्या/तरुणांच्या आर्थिक क्षमतेचा प्रभावी वापर करण्यासाठी कोणत्या प्रकारच्या रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी अधिक उपयुक्त ठरू शकतात, स्थानिक साधनसंपत्तीचा उपयोग करून शाश्वत रोजगार कसा निर्माण करता येईल आणि विद्यमान अडचणी दूर करण्यासाठी कोणत्या धोरणात्मक उपाययोजना आवश्यक आहेत, याबाबत वस्तुनिष्ठ निष्कर्ष प्राप्त होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे हे संशोधन आदिवासी युवकांचे/तरुणांचे आर्थिक सक्षमीकरण, स्थानिक रोजगारनिर्मिती, स्वयंरोजगाराला प्रोत्साहन आणि शाश्वत सामाजिक-आर्थिक विकास यासाठी उपयुक्त ठरू शकते. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्यातील आदिवासी क्षेत्रातील १८ ते ४५ वयोगटातील आदिवासी तरुणांसाठी स्थानिक रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधींचा सर्वंकष अभ्यास अपेक्षित आहे. सबब, सदर अभ्यासास संस्थेच्या नियामक मंडळाच्या दिनांक ९ मार्च २०२६ च्या बैठक इतिवृत्त परिशिष्ट-४ विषय क्रमांक ५(१) अन्वये "***आदिवासी तरुणांमध्ये स्थानिक रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी (१८ ते ४५ वयोगट)***" या विषयाच्या संशोधनास तत्वत: मान्यता देण्यात आलेली आहे.
उद्दिष्टे	संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे: १. आदिवासी क्षेत्रातील आदिवासी युवक/तरुणांच्या सामाजिक-आर्थिक व शैक्षणिक स्थितीचे विश्लेषण करणे.

	२. स्थानिक रोजगार व स्वयंरोजगाराच्या विद्यमान संधींचे क्षेत्रनिहाय मॅपिंग करणे. ३. आदिवासी क्षेत्रातील आदिवासींच्या कृषी, वनाधारित उद्योग, लघुउद्योग, सेवाक्षेत्र, पर्यटन, डिजिटल अर्थव्यवस्था, हस्तकला, पशुपालन, मत्स्यव्यवसाय इत्यादी क्षेत्रांतील रोजगारक्षम संधींचा अभ्यास करणे. ४. शासनाच्या रोजगार केंद्रित विविध योजनांचा लाभ, प्रभाव आणि अंमलबजावणीतील अडचणींचे विश्लेषण करणे. ५. कौशल्य विकास, उद्योजकता आणि बाजारपेठेतील प्रवेशासंबंधीच्या गरजा ओळखणे. ६. स्थानिक संसाधनांवर आधारित शाश्वत स्वयंरोजगाराच्या योजनां /मॉडेल्स सुचविणे. ७. धोरणात्मक सुधारणा व कृती आराखड्यासाठी शिफारसी सादर करणे. ८. आदिवासी क्षेत्राचा सर्वसमावेशक रोजगार स्वयंरोजगार आराखडा निर्मिती करणे. ९. सदर आराखडा अंमलबजावणीची कार्यपद्धती सुनिश्चित करणे.
संशोधना क्षेत्र मर्यादा:	महाराष्ट्र राज्यातील आदिवासी क्षेत्र (TSP/ATSP/MADA/MiniMADA)
संशोधनाची व्याप्ती:	अभ्यासामध्ये पुढील बाबींचा समावेश अपेक्षित आहे: १. महाराष्ट्रातील आदिवासी उपयोजना (TSP/ATSP/MADA/MiniMADA) क्षेत्रातील जिल्हे/तालुके/गाव/पाडे २. रोजगारक्षम सर्व आदिवासी बांधव तथापि, १८ ते ४५ या कार्यप्रवण वयोगटातील आदिवासी युवक व युवतीस विशेष प्राधान्य ३. रोजगार, स्वयंरोजगार, स्थलांतर, कौशल्य विकास, उद्योजकता, महिला सहभाग, डिजिटल व्यासपीठ, स्थानिक संसाधने आणि बाजारपेठेची सद्यस्थिती. ४. शासकीय विभाग, वित्तीय संस्था, स्वयंसेवी संस्था, उद्योग संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग शक्यता, आदिवासी कुटुंबाच्या उत्पन्नाची साधने व त्यांची क्षमता ५. रोजगार व स्वयंरोजगाराकरिता शासकीय अर्थसहाय्य आणि वसुली पध्दती.
अपेक्षित संशोधन पद्धती:	संशोधन प्रकल्पात पुढील बाबींचा समावेश अपेक्षित असेल. १. मिश्र संशोधन पद्धती (Quantitative आणि Qualitative). २. प्राथमिक व दुय्यम माहिती संकलन. ३. आदिवासी क्षेत्रातील प्रादेशिक, विभागनिहाय प्रत्येक तालुक्यातून नमूना निवड करणे बंधनकारक राहील. ४. कुटुंब सर्वेक्षण, ५. लक्षाधारीत गटचर्चा (FGD). ६. प्रमुख हितधारकांच्या मुलाखती. ७. यशस्वी उद्योजकांचे केस स्टडी. ८. सांख्यिकीय विश्लेषण व GIS आधारित क्षेत्रीय विश्लेषण (आवश्यकतेनुसार) सदर बाबी व अनुषंगिक घटक अंतर्भूत करून सेवापुरवठादार यंत्रणेकडून सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) प्राप्त करण्यात येईल व त्यास कार्यालयातील संशोधन परिषदेमार्फत छाननी करुन मान्यता देण्यात येईल. सदर मान्यतेनुसार संबंधित सेवापुरवठादार यंत्रणेकडून प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येईल.

नियंत्रक यंत्रणा	आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
अंमलबजावणी यंत्रणा	बाह्यस्त्रोत यंत्रणा
बाह्यस्त्रोत यंत्रणा पात्रता निकष	बाह्यस्त्रोत यंत्रणेचे पात्रता निकष खालीलप्रमाणे असतील. १) मान्यताप्राप्त शासकीय विद्यापीठे २) नोंदणीकृत /शासन मान्यता प्राप्त संशोधन संस्था. ३) नोंदणीकृत शासन मान्यता प्राप्त असणे. ४) संशोधन कार्याचा किमान ३ वर्ष अनुभव. ५) संशोधन विषयक पात्रताधारक अनुभवी कर्मचारी वृंद. ६) शासकीय/निमशासकीय कार्यालयाचे प्रकल्प पूर्ण केलेले असणे व सद्यस्थितीत या कार्यालयात तर्फे प्रकल्प सुरू असणे. ७) स्थळपाहणीत आढळून येणारी वस्तुस्थिती
बाह्यस्त्रोत यंत्रणा निवड कार्यपध्दती	विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून वरील निकषांची पूर्तता करणाऱ्या प्राप्त प्रस्तावामधून गुणांकन पद्धतीने पात्र ठरणाऱ्या बाह्यस्त्रोत यंत्रणेची निवड करण्यात येईल.
अंमलबजावणी कार्यपध्दती	१) विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन पात्रताधारक बाह्यस्त्रोत यंत्रणेची निवड करणे. २) सदर निवड झालेल्या यंत्रणेस कार्यारंभ आदेश देणे व त्यासमवेत करारनामा करणे. ३) निवड झालेल्या यंत्रणेकडून कार्यारंभ आदेशानुसार अपेक्षित संशोधन प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) प्राप्त करणे. ४) सदर सविस्तर प्रकल्प अहवालाची नियंत्रक यंत्रणेच्या कार्यालयातील संशोधन परिषदेमार्फत छाननी करून घेणे व त्यास मान्यता देणे. ५) मान्य सविस्तर प्रकल्प अहवालानुसार संबंधित सेवापुरवठादार बाह्यस्त्रोत यंत्रणेकडून अंमलबजावणी करून घेणे. ६) सदर सविस्तर प्रकल्प अहवालातील कार्यवाहीच्या टप्प्यानुसार झालेल्या कामकाजाचे स्थळपाहणीद्वारे परिक्षण करणे. ७) सदर परिक्षणानुसार झालेल्या कामकाजाचे मुल्यांकन करून टप्प्यानुसार अनुज्ञेय रक्कम अदायगी करणे. ८) सेवापुरवठादार बाह्यस्त्रोत यंत्रणेकडून आवश्यकतेनुसार साप्ताहिक/ पाक्षिक/ मासिक/ त्रैमासिक/सहामाही प्रगती अहवाल प्राप्त करण्यात येईल. त्यानुसार कामकाजाचा आढावा घेण्यात येईल व आवश्यक अनुपाल करुन घेण्यात येईल. ९) प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर विहीत नमून्यात प्रकल्पपूर्ती अहवाल, अनुषंगिक डाटाबेस सेवापुरवठादार बाह्यस्त्रोत यंत्रणेकडून प्राप्त करुन घेण्यात येईल. सदर अहवाल व माहितीची छाननी करून अंतिम टप्प्याची अनुज्ञेय रक्कम अदायगी करण्यात येईल.
कालावधी मर्यादा:	एक वर्ष

प्रकल्प संनियंत्रण पध्दती	१. त्रैमासिक अहवाल प्राप्ती व आढावा आणि अनुपालन २. संशोधन परिषदेतील अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष क्षेत्रभेट व त्यानुसार अनुपालन ३. झालेल्या कामकाजाची नियमित तपासणी व सुधारणा
अपेक्षित खर्च:	५० लाख रुपये

नियमक मंडळाची तत्वत: मान्यता रक्कम	अ.क्र.	बाब	अपेक्षित खर्च (रुपये)
१	२	३	४
५००००००	१	संशोधन कर्मचारी: पूर्णवेळ/अर्धवेळ/बाह्य सेवा (Hired services) एकूण मान्य रक्कमेच्या ४५% पेक्षा जास्त नाही	२२५००००
	२	क्षेत्रीय कार्य (Field work) ३५% पेक्षा जास्त नाही	१७५००००
	३	संशोधन उपकरणे आणि अभ्यास साहित्य (संगणक, प्रिंटर इ.) १०% पेक्षा जास्त नाही	५०००००
	४	आकस्मिक खर्च (Contingency) ५% पेक्षा जास्त नाही	२५००००
	५	प्रकाशन/कार्यशाळा/चर्चासत्र * प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार TRTI,Pune द्वारे हे निश्चित केले जाईल. अंदाजे ५%	२५००००
	एकुण		५०००००

निधीस्त्रोत	ठोक अनुदान (Corpus Fund)
निधी अदायगी टप्पे	बाह्यस्त्रोत यंत्रणेस पुढील टप्पेनिहाय कामाच्या प्रगती नुसार अनुज्ञेय रक्कम अदा करण्यात येईल.

नियमक मंडळाची तत्वत: मान्यता रक्कम	अ.क्र.	बाब	अपेक्षित खर्च (रुपये)
१	२	३	४
५००००००		प्रस्ताव मान्यतेनंतर ५ टक्के,	२५००००
		माहिती संकलन १० टक्के,	५०००००
		प्राप्त माहिती छाननी व डाटा एन्ट्री १५ टक्के,	७५००००
		माहितीचे पृथक्करण १५ टक्के,	७५००००
		अहवाल लेखन १० टक्के,	५०००००
		प्रारूप अहवाल सादरीकरण १५ टक्के	७५००००
		प्रारूप अहवाल मान्यतेनंतर छपाई केलेला अहवाल प्रुफ रीडिंगसाठी सादरीकरण १५ टक्के,	७५००००
		प्रकल्पपूर्ती अहवाल १५ टक्के,	७५००००
		एकुण	**५००००००**

मध्यावधी आढावा	१. प्रकल्प अंमलबजावणी सुरु झाल्यानंतर अंमलबजावणीचा विहित नमुन्यात मासिक खर्च व अंमलबजावणी प्रगती अहवाल प्राप्त करण्यात येईल. त्यानुसार दरमहा संबंधितास आवश्यक लेखी सूचना निर्गमित करण्यात येतील व त्याप्रमाणे अनुपालन करून घेण्यात येईल. २. संशोधन परिषदेमार्फत प्रकल्पाचा मध्यावधी आढावा घेऊन एकंदरीत कामकाजाचे मूल्यमापन करण्यात येईल. त्यानुसार अंमलबजावणीत आवश्यक सुधारणा करून उर्वरित अंमलबजावणी पूर्ण करून घेण्यात येईल. ३. अंमलबजावणी यंत्रणा कार्यारंभ आदेश, करारनाम्यानुसार कार्यवाही करत नसल्यास मान्यता काढून घेणे, वसुली लावणे वा वित्तीय नियमावलीनुसार उचित दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.
प्रकल्पपूर्ती अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र	विहित नमुन्यात सर्वसमवेशक प्रकल्पपूर्ती अहवाल, खर्चाच्या सविस्तर तपशीलासह उपयोगीता प्रमाणपत्र प्राप्त करण्यात येईल, तसेच प्रकल्पपूर्ती अहवालाची छाननी करून अंतिम करून घेण्यात येईल.
फलनिष्पत्ती	१) आदिवासी क्षेत्राचे रोजगार, स्वयंरोजगार धोरण अस्तित्वात येणे. २) जिल्हानिहाय व क्षेत्रनिहाय रोजगार संधींचा अहवाल तयार होणे. त्याआधारे आदिवासी क्षेत्र रोजगार, स्वयंरोजगार आराखडा निर्माण होणे. ३) सदर आराखडा अंमलबजावणीसाठी उपक्रम निश्चित होऊन स्थानिक रोजगार, स्वयंरोजगार निर्मिती प्रक्रिया सुरू होणे. ४) कृषी, वनाधारित उद्योग, लघुउद्योग, सेवाक्षेत्र, पर्यटन, डिजिटल अर्थव्यवस्था, हस्तकला, पशुपालन, मत्स्यव्यवसाय इत्यादी क्षेत्रांतील रोजगार व स्वयंरोजगाराच्या विद्यमान संधींचे क्षेत्रनिहाय मॅपिंग करणे शक्य होणे. ५) शासनाच्या विविध योजनांचा लाभ, प्रभाव आणि अंमलबजावणीतील अडचणी तसेच अनुषांगिक शासकीय योजनांमधील अंतर विश्लेषण (Gap Analysis) करून योजनांमधील बदलाबाबत रूपरेषा स्पष्ट होणे. ६) विविध क्षेत्रांतील रोजगार व स्वयंरोजगाराच्या विद्यमान संधीच्या विश्लेषणामुळे स्थलांतरास प्रतिबंध होण्यासाठी पायाभूत उपाययोजना अस्तित्वात येणे. ७) सदर उपाययोजना अंमलबजावणीतून स्थलांतर प्रतिबंधास सुरुवात होणे.

(निलेश सागरे, भा.प्र.से.)
आयुक्त
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

प्रकल्प मार्गदर्शक सूचना

संशोधन विषय	महाराष्ट्र राज्याच्या आदिवासी क्षेत्रातील पर्यटनाचे विकासात्मक शास्त्रीय अध्ययन
पार्श्वभूमी:	महाराष्ट्र राज्यात आदिवासी बांधवांचा प्रामुख्याने डोंगराळ, वनसमृद्ध व नैसर्गिक साधनसंपत्तीने संपन्न भागात रहिवास आहे. या प्रदेशात जैवविविधता, वनसंपदा, पारंपरिक कला, संस्कृती, हस्तकला, लोकपरंपरा, आदिवासी खाद्यसंस्कृती, उत्सव, धार्मिक व सांस्कृतिक स्थळे तसेच निसर्गरम्य भौगोलिक वैशिष्ट्ये यांची विपुलता आहे. या नैसर्गिक संपत्ती व सांस्कृतिक घटकांच्या आधारे आदिवासी भागात शाश्वत पर्यटन विकसित करण्यास वाव आहे. पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती, स्वयंरोजगार, महिला व युवकांचे आर्थिक सक्षमीकरण, स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ, पारंपरिक कला व संस्कृतीचे संवर्धन आणि आदिवासी समुदायांच्या उत्पन्नात वाढ साध्य होऊ शकते. तथापि, आदिवासी भागातील पर्यटनाचा विकास करताना पर्यावरणीय समतोल, स्थानिक संस्कृतीचे संरक्षण, आदिवासी समुदायांचा सहभाग, स्थानिक अर्थव्यवस्था आणि पर्यटनाच्या वहनक्षमतेचा विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे उपलब्ध पर्यटन क्षमता, विद्यमान अडचणी, स्थानिक आदिवासी समुदायांचा सहभाग आणि भविष्यातील शाश्वत पर्यटन विकास यांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणे आवश्यक आहे. सबब, सदर अभ्यासास संस्थेच्या नियामक मंडळाच्या दिनांक ९ मार्च २०२६ च्या बैठक इतिवृत्त परिशिष्ट-४ विषय क्रमांक ५(१) अन्वये ***"महाराष्ट्रातील आदिवासी भागातील पर्यटनविषयक संशोधन करणे."*** या विषयाच्या संशोधनास तत्वत: मान्यता देण्यात आलेली आहे.
उद्दिष्टे	१) आदिवासी क्षेत्रातील विद्यमान व संभाव्य पर्यटन स्थळांची समाजास ओळख करून देणे. २) निसर्ग पर्यटन, साहसी पर्यटन, सांस्कृतिक पर्यटन, आदिवासी वारसा पर्यटन, ग्रामीण पर्यटन, कृषी पर्यटन व इतर योग्य पर्यटन प्रकारांची क्षमता तपासणे. ३) स्थानिक आदिवासी समुदायांचा पर्यटनातील सहभाग, भूमिका व आर्थिक लाभ यांचा अभ्यास करणे. ४) पर्यटनामुळे स्थानिक रोजगार, उत्पन्न, उद्योजकता व उपजीविकेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे. ५) आदिवासी महिला, युवक, स्वयंसहाय्यता गट, स्थानिक कारागीर व सूक्ष्म उद्योजकांसाठी उपलब्ध पर्यटनाधारित संधींचा शोध घेणे. ६) आदिवासी संस्कृती, लोककला, परंपरा, हस्तकला व पारंपारिक ज्ञान यांच्या पर्यटनातील वापराची तसेच संवर्धनाची शक्यता तपासणे. ७) पर्यटन विकासासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, वाहतूक, निवास, डिजिटल सुविधा, माहिती व सुरक्षा व्यवस्था अभ्यासणे. ८) पर्यावरणीय संवेदनशीलता, जैवविविधता आणि पर्यटनाची वहनक्षमता यांचा अभ्यास करणे. ९) आदिवासी भागासाठी आदिवासी केंद्रित व पर्यावरणपूरक पर्यटन विकासाचे मॉडेल

	विकसित करणे. १०) निवडक पर्यटन स्थळांच्या विकासार्थ व्यवहार्य कृती आराखडे (Action Plans) तयार करणे. ११) राज्याचे पर्यटन धोरणाशी सुसंगत उपक्रम अंमलबजावणीसाठी शिफारसी सादर करणे.
संशोधना क्षेत्र मर्यादा:	महाराष्ट्र राज्यातील TSP/ATSP/MADA/MiniMADA या आदिवासी क्षेत्रातील विद्यमान पर्यटन व संभाव्य पर्यटन स्थळांचा विकास याबाबत संशोधन करताना या प्रत्येक क्षेत्रातून नमूना निवड करणे बंधरकारक राहील.
संशोधनाची व्याप्ती:	अभ्यासामध्ये पुढील बाबींचा समावेश अपेक्षित आहे: १. महाराष्ट्रातील TSP/ATSP/MADA/MiniMADA आदिवासी क्षेत्रातील जिल्हे/तालुके/गावे यामधील ऐतिहासिक, धार्मिक, नैसर्गिक स्थळे विचारात घेणे. २. महाराष्ट्रातील आदिवासी भागात नैसर्गिक साधनसंपत्ती, वनक्षेत्र, जैवविविधता आणि सांस्कृतिक वारसा ३. महाराष्ट्र पर्यटन विभागाची विद्यमान उद्दिष्टे ४. आदिवासी पर्यटन, पर्यावरणीय पर्यटन, समुदायाधारित पर्यटन, ग्रामीण पर्यटन, आणि स्थानिक कला-हस्तकला इत्यादी प्रकारास असलेला वाव, बाधा व उपाय. ५. पर्यटनाचे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, आणि पर्यावरणीय बहुआयामी स्वरूप ६. विद्यमान पर्यटन स्थळे व तेथील सुविधा विस्तारास असलेला वाव. ७. पर्यटनाशी निगडित योजना व त्यांचा प्रभाव आणि यशोगाथा. ८. पर्यटनाचा आदिवासी जीवनावरील प्रभाव आणि यशोगाथा.
अपेक्षित संशोधन पद्धती:	संशोधन प्रस्तावात पुढील बाबींचा समावेश अपेक्षित आहे. १ मिश्र संशोधन पद्धती (Quantitative आणि Qualitative). २ प्राथमिक व दुय्यम माहिती संकलन. ३ सदर क्षेत्रातील प्रादेशिक, विभागनिहाय प्रत्येक तालुक्यातून नमूना निवड करणे बंधनकारक राहील. ४ कुटुंब सर्वेक्षण, ५ लक्षाधारीत गटचर्चा (FGD). ६ प्रमुख हितधारकांच्या मुलाखती. ७ यशस्वी उद्योजकांचे केस स्टडी. ८ सांख्यिकीय विश्लेषण व GIS आधारित क्षेत्रीय विश्लेषण (आवश्यकतेनुसार). सदर बाबी व अनुषंगिक घटक अंतर्भूत करून सेवापुरवठादार यंत्रणेकडून सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) प्राप्त करण्यात येईल व त्यास कार्यालयातील संशोधन परिषदेमार्फत छाननी करुन मान्यता देण्यात येईल. सदर मान्यतेनुसार संबंधित सेवापुरवठादार यंत्रणेकडून प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येईल.
नियंत्रक यंत्रणा	आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

अंमलबजावणी यंत्रणा	बाह्यस्त्रोत यंत्रणा
बाह्य स्त्रोत यंत्रणा पात्रता निकष	बाह्यस्त्रोत यंत्रणेचे पात्रता निकष खालीलप्रमाणे असतील. १) मान्यताप्राप्त शासकीय विद्यापीठे २) नोंदणीकृत /शासन मान्यता प्राप्त संशोधन संस्था. ३) नोंदणीकृत शासन मान्यता प्राप्त असणे. ४) संशोधन कार्याचा किमान ३ वर्ष अनुभव. ५) संशोधन विषयक पात्रताधारक अनुभवी कर्मचारी वृंद. ६) शासकीय/निमशासकीय कार्यालयाचे प्रकल्प पूर्ण केलेले असणे व सद्यस्थितीत या कार्यालयात तर्फे प्रकल्प सुरू असणे. ७) स्थळपाहणीत आढळून येणारी वस्तुस्थिती
बाह्य स्त्रोत यंत्रणा निवड कार्यपध्दती	विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून वरील निकषांची पूर्तता करणाऱ्या प्राप्त प्रस्तावामधून गुणांकन पद्धतीने पात्र ठरणाऱ्या बाह्यस्त्रोत यंत्रणेची निवड करण्यात येईल.
अंमलबजावणी कार्यपध्दती	१) विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन पात्रताधारक बाह्यस्त्रोत यंत्रणेची निवड करणे. २) सदर निवड झालेल्या यंत्रणेस कार्यारंभ आदेश देणे व त्यासमवेत करारनामा करणे. ३) निवड झालेल्या यंत्रणेकडून कार्यारंभ आदेशानुसार अपेक्षित संशोधन प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) प्राप्त करणे. ४) सदर सविस्तर प्रकल्प अहवालाची नियंत्रक यंत्रणेच्या कार्यालयातील संशोधन परिषदेमार्फत छाननी करून घेणे व त्यास मान्यता देणे. ५) मान्य सविस्तर प्रकल्प अहवालानुसार संबंधित सेवापुरवठादार बाह्यस्त्रोत यंत्रणेकडून अंमलबजावणी करून घेणे. ६) सदर सविस्तर प्रकल्प अहवालातील कार्यवाहीच्या टप्प्यानुसार झालेल्या कामकाजाचे स्थळपाहणीद्वारे परिक्षण करणे. ७) सदर परिक्षणानुसार झालेल्या कामकाजाचे मुल्यांकन करून टप्प्यानुसार अनुज्ञेय रक्कम अदायगी करणे. ८) सेवापुरवठादार बाह्यस्त्रोत यंत्रणेकडून आवश्यकतेनुसार साप्ताहिक/ पाक्षिक/ मासिक/ त्रैमासिक/सहामाही प्रगती अहवाल प्राप्त करण्यात येईल. त्यानुसार कामकाजाचा आढावा घेण्यात येईल व आवश्यक अनुपाल करुन घेण्यात येईल. ९) प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर विहीत नमून्यात प्रकल्पपूर्ती अहवाल, अनुषंगिक डाटाबेस सेवापुरवठादार बाह्यस्त्रोत यंत्रणेकडून प्राप्त करुन घेण्यात येईल. सदर अहवाल व माहितीची छाननी करून अंतिम टप्प्याची अनुज्ञेय रक्कम अदायगी करण्यात येईल.
कालावधी मर्यादा:	एक वर्ष
प्रकल्प संनियंत्रण पध्दती	१. त्रैमासिक अहवाल प्राप्ती व आढावा आणि अनुपालन २. संशोधन परिषदेतील अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष क्षेत्रभेट व त्यानुसार अनुपालन ३. झालेल्या कामकाजाची नियमित तपासणी व सुधारणा

अपेक्षित खर्च

११० लाख रुपये

नियमक मंडळाची तत्वत: मान्यता रक्कम	अ.क्र.	बाब	अपेक्षित खर्च (रुपये)
१	२	३	४
११००००००	१	संशोधन कर्मचारी: पूर्णवेळ/अर्धवेळ/बाह्य सेवा (Hired services) एकूण मान्य रक्कमेच्या ४५% पेक्षा जास्त नाही	४९५००००
	२	क्षेत्रीय कार्य (Field work) ३५% पेक्षा जास्त नाही	३८५००००
	३	संशोधन उपकरणे आणि अभ्यास साहित्य (संगणक, प्रिंटर इ.) १०% पेक्षा जास्त नाही	११०००००
	४	आकस्मिक खर्च (Contingency) ५% पेक्षा जास्त नाही	५५०००००
	५	प्रकाशन/कार्यशाळा/चर्चासत्र * प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार TRTI, Pune द्वारे हे निश्चित केले जाईल. अंदाजे ५%	५५०००००
	एकुण		११०००००

निधीस्त्रोत

ठोक अनुदान (Corpus Fund)

निधी अदायगी टप्पे

बाह्यस्त्रोत यंत्रणेस पुढील टप्पेनिहाय कामाच्या प्रगती नुसार अनुज्ञेय रक्कम अदा करण्यात येईल.

नियमक मंडळाची तत्वत: मान्यता रक्कम	अ.क्र.	बाब	अपेक्षित खर्च (रुपये)
१	१	२	३
११००००००		प्रस्ताव मान्यतेनंतर ५ टक्के,	५५०००००
		माहिती संकलन १० टक्के,	११०००००
		प्राप्त माहिती छाननी व डाटा एन्ट्री १५ टक्के,	१६५०००००
		माहितीचे पृथक्करण १५ टक्के,	१६५०००००
		अहवाल लेखन १० टक्के,	११०००००
		प्रारूप अहवाल सादरीकरण १५ टक्के,	१६५०००००
		प्रारूप अहवाल मान्यतेनंतर छपाई केलेला अहवाल प्रुफ रीडिंगसाठी सादरीकरण १५ टक्के,	१६५०००००
		प्रकल्पपूर्ती अहवाल १५ टक्के,	१६५०००००
	एकुण		११०००००

मध्यावधी आढावा	१. प्रकल्प अंमलबजावणी सुरु झाल्यानंतर अंमलबजावणीचा विहित नमुन्यात मासिक खर्च व अंमलबजावणी प्रगती अहवाल प्राप्त करण्यात येईल. त्यानुसार दरमहा संबंधितात आवश्यक लेखी सूचना निर्गमित करण्यात येतील व त्याप्रमाणे अनुपालन करून घेण्यात येईल. २. संशोधन परिषदेमार्फत प्रकल्पाचा मध्यावधी आढावा घेवून एकंदरीत कामकाजाचे मूल्यमापन करण्यात येईल. त्यानुसार अंमलबजावणीत आवश्यक सुधारणा करून उर्वरित अंमलबजावणी पूर्ण करून घेण्यात येईल. ३. अंमलबजावणी यंत्रणा कार्यारंभ आदेश, करारनाम्यानुसार कार्यवाही करत नसल्यास मान्यता काढून घेणे, वसुली लावणे वा वित्तीय नियमावलीनुसार उचित दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.
प्रकल्पपूर्ती अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र	विहित नमुन्यात सर्वसमवेशक प्रकल्पपूर्ती अहवाल, खर्चाच्या सविस्तर तपशीलासह उपयोगीता प्रमाणपत्र प्राप्त करण्यात येईल, तसेच प्रकल्पपूर्ती अहवालाची छाननी करून अंतिम करून घेण्यात येईल.
फलनिष्पत्ती	१. आदिवासी पर्यटन विकास आराखडा तयार होणे. २. त्या अनुषंगाने राज्य पर्यटन धोरणाशी सुसंगत प्रारूप आदिवासी पर्यटन धोरण मसुदा तयार होणे. ३. सदर धोरणांन्वये पर्यटन केंद्रित विद्यमान योजना सुधारणा, गतिमानता व नूतन योजना अस्तित्वात येणे. ४. स्थानिक रोजगार निर्मिती व स्थलांतरितांचे प्रमाणातं घट होणे. ५. समाजास आदिवासी क्षेत्रातील पर्यटन स्थळांची माहिती उपलब्ध होणे व ते सदर पर्यटन स्थळांकडे आकर्षित होणे त्यामधून स्थानिक रोजगार, स्वयंरोजगाराला चालना मिळणे. ६. जिल्हानिहाय व पर्यटन क्षेत्रनिहाय विद्यमान संधीच्या विश्लेषणामुळे स्थलांतरास प्रतिबंध होण्यासाठी पायाभूत उपाययोजना उपलब्ध होणे. ७. स्थानिक रोजगार निर्मिती व स्थलांतरितांचे प्रमाणात घट होणे.

(निलेश सागर, भा.प्र.से.)
आयुक्त
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

प्रकल्प मार्गदर्शक सूचना

संशोधन विषय	महाराष्ट्र राज्यातील आदिवासी महिला समस्या व गरजांबाबत सर्वसमावेशक शास्त्रीय अध्ययन
पार्श्वभूमी:	जनगणना २०११ अन्वये महाराष्ट्र राज्याची एकूण आदिवासी लोकसंख्या १,०५,१०,२१३ इतकी आहे. त्यापैकी ५१,९५,१८८ इतकी महिला लोकसंख्या आहे. त्यानुसार महिलांचे प्रमाण एकूण आदिवासी लोकसंख्येच्या ४९.४३ टक्के इतके आहे. सदर महिलांमध्ये विविध उत्पन्न गट, मजुरी करणाऱ्या, सामाजिक सुरक्षा सदरात येणाऱ्या, नोकरी व्यवसाय करणाऱ्या, स्थैर्यता असलेल्या, स्थलांतर करणाऱ्या, विविध व्याधीग्रस्त, विद्यार्थी दशेतील मुली, याप्रमाणे विविध प्रकारात येणाऱ्या महिला आहेत. या प्रत्येक महिलांच्या गरजा भिन्न- भिन्न आहेत. त्यानुसार त्यांच्या सक्षमीकरणाकरिता उपाययोजना अपेक्षित आहेत. महाराष्ट्रातील आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासामध्ये आदिवासी महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. कुटुंब, शेती, वनोपज संकलन, पशुपालन, मजुरी, लघुउद्योग, कुटुंबाची आर्थिक जबाबदारी, बालसंगोपन आणि सामाजिक-सांस्कृतिक जीवन या विविध क्षेत्रांमध्ये आदिवासी महिला महत्त्वपूर्ण योगदान देतात. तथापि, त्यांच्यासमोर शिक्षण, आरोग्य, पोषण, सुरक्षित मातृत्व, पिण्याचे पाणी, स्वच्छता, रोजगार, कौशल्य विकास, आर्थिक विकास, जमीन व मालमत्ता हक्क, डिजिटल साक्षरता, बाजारपेठेपर्यंत पोहोच, सामाजिक सुरक्षा आणि निर्णयप्रक्रियेमधील सहभाग अशा अनेक समस्या आहेत. आदिवासी विकास विभागामार्फत सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्य, पोषण, रोजगार इत्यादी क्षेत्रांमध्ये विविध योजना राबविण्यात येतात. त्याअनुषंगाने आदिवासी घटक कार्यक्रम अंतर्गत जिल्हा व राज्यस्तरीय योजनांकरिता निधी उपलब्ध करून देण्यात येतो. सदर योजनांपैकी निवडक योजनांचा लाभ थेट महिलांना होत असल्याचे निर्दशनास येते. त्यामाध्यमातून महिला विकसित होत असतील. तथापी, त्याबाबतची वस्तुस्थिती तपासणे आवश्यक ठरते. या पार्श्वभूमीवर आदिवासी महिलांच्या वास्तविक समस्या, गरजा, त्यांना अवगत असलेले कलागुण, उपलब्ध संसाधने, शासकीय योजनांचा लाभ, लाभाचा होणारा विनियोग, त्याचे परिणाम, योजना लाभातील अडथळे आणि भविष्यातील गरजा यांचा शास्त्रीय, क्षेत्राधारित अभ्यास करणे आवश्यक आहे. आदिवासी कुटुंबाचे सक्षमीकरण करण्यासाठी महिला सक्षमीकरण अनिवार्य आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्याच्या TSP/ATSP/MADA/MiniMADA या क्षेत्रामध्ये संशोधन प्रस्तावित आहे. सबब, सदर अभ्यास तथा संशोधनास संस्थेच्या नियामक मंडळाच्या दिनांक ९ मार्च २०२६ च्या बैठक इतिवृत्त परिशिष्ट-४ विषय क्रमांक ५(१) अन्वये "***आदिवासी महिला समस्या व गरजांबाबत संशोधन करणे.***" या विषयाच्या संशोधनास तत्वत: मान्यता देण्यात आलेली आहे.

उद्दिष्टे	१. राज्याच्या महिला धोरणांन्वये अनुज्ञेय तरतूदींचे अनुपालन बाबतची सद्यस्थिती व सदर तरतूदींच्या अनुपालनार्थ सुसंगत उपाययोजना सुचविणे. २. आदिवासी महिलांना अवगत कलागुण, त्यांच्या विद्यमान सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व लोकसंख्याशास्त्रीय स्थितीचा अभ्यास करणे. ३. आदिवासी महिलांच्या शिक्षणातील प्रमुख अडथळे व उच्च शिक्षण आणि कौशल्य विकसनाच्या गरजा निश्चित करणे. ४. माता व किशोरवयीन मुलींचे आरोग्य, पोषण, प्रजनन आरोग्य, मातृत्व सेवा आणि शासकीय आरोग्य सुविधांची पोहोच यांचा अभ्यास करणे. ५. जमीन, वनाधिकार, मालमत्ता व वारसा हक्कांच्या संदर्भातील महिलांची स्थिती व अडचणींचा अभ्यास करणे. ६. आदिवासी महिलांना उपलब्ध असलेल्या केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची माहिती, पात्रता, लाभप्राप्ती आणि लाभातील अडथळे आणि लाभाची परिणामकारकता अभ्यासणे. ७. आदिवासी महिलां सदरातील किशोरवयीन मुली, विवाहित, विधवा/एकल, वृद्ध, दिव्यांग आणि विशेषतः असुरक्षित गट इत्यादी गटांच्या स्वतंत्र गरजा ओळखणे व गरजापूर्ती बाबत उपाययोजना निश्चिती करणे. ८. आदिवासी महिलांच्या विकासासाठी अल्पकालीन, मध्यमकालीन व दीर्घकालीन धोरणात्मक शिफारसी करणे.
संशोधन क्षेत्र मर्यादा:	महाराष्ट्र राज्यातील TSP/ATSP/MADA/MiniMADA या आदिवासी क्षेत्रातील संशोधन करताना ***उद्दिष्ट क्रमांक ७ मध्ये*** नमूद प्रत्येक गटातील महिलांच्या समस्या/गरजा बाबत व प्रत्येक आदिवासी क्षेत्रातून नमूना निवड करणे बंधरकारक राहील.
संशोधनाची व्याप्ती:	अभ्यासामध्ये पुढील बाबींचा समावेश अपेक्षित आहे: १. महाराष्ट्रातील TSP/ATSP/MADA/MiniMADA या आदिवासी क्षेत्रातील जिल्हे/ तालुके/ गावे/पाडे यामधील उत्पन्न गटनिहाय आदिवासी महिला. २. आदिवासी महिलांच्या सर्व क्षेत्रातील समस्या व गरजांचा व त्या निवारणार्थ अपेक्षित उपाय ३. प्रस्तावित संशोधनाची व्याप्ती महिलांच्या सामाजिक, आर्थिक, आरोग्य, शैक्षणिक, सांस्कृतिक, पर्यावरणीय, प्रशासकीय आणि हक्काधारित अशा बहुआयामी स्वरूपाची असणे अपेक्षित आहे. ४. राज्य महिला धोरणातील तरतूदी, त्यांचे अनुपालन व अनुपालनातील उणीवांचा शोध.

अपेक्षित संशोधन पद्धती:	संशोधन प्रस्तावात पुढील बाबींचा समावेश अपेक्षित आहे. १ मिश्र संशोधन पद्धती (Quantitative आणि Qualitative). २ प्राथमिक व दुय्यम माहिती संकलन. ३ सदर क्षेत्रातील प्रादेशिक, विभागनिहाय प्रत्येक तालुक्यातून नमूना निवड करणे बंधनकारक राहील. ४ कुटुंब सर्वेक्षण, ५ लक्षाधारीत गटचर्चा (FGD). ६ प्रमुख हितधारकांच्या मुलाखती. ७ यशस्वी उद्योजकांचे केस स्टडी. ८ सांख्यिकीय विश्लेषण व GIS आधारित क्षेत्रीय विश्लेषण (आवश्यकतेनुसार). सदर बाबी व अनुषंगिक घटक अंतर्भूत करून सेवापुरवठादार यंत्रणेकडून सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) प्राप्त करण्यात येईल व त्यास कार्यालयातील संशोधन परिषदेमार्फत छाननी करुन मान्यता देण्यात येईल. सदर मान्यतेनुसार संबंधित सेवापुरवठादार यंत्रणेकडून प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येईल.
नियंत्रक यंत्रणा	आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
अंमलबजावणी यंत्रणा	बाह्यस्त्रोत यंत्रणा
बाह्य स्त्रोत यंत्रणा पात्रता निकष	बाह्यस्त्रोत यंत्रणेचे पात्रता निकष खालीलप्रमाणे असतील. १) मान्यताप्राप्त शासकीय विद्यापीठे/महिला विद्यापीठे. २) नोंदणीकृत /शासन मान्यता प्राप्त संशोधन संस्था. ३) नोंदणीकृत शासन मान्यता प्राप्त असणे. ४) संशोधन कार्याचा किमान ३ वर्ष अनुभव. ५) संशोधन विषयक पात्रताधारक अनुभवी कर्मचारी वृंद. ६) शासकीय/निमशासकीय कार्यालयाचे प्रकल्प पूर्ण केलेले असणे व सद्यस्थितीत या कार्यालयात तर्फे प्रकल्प सुरू असणे. ७) महिला व बालविकास क्षेत्रातील संशोधन प्रकल्प हाताळणाऱ्या यंत्रणेस प्राधान्य. ८) प्रत्यक्षात महिला व बालकांच्या विकासार्थ योजना अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेस प्राधान्य. ९) स्थळपाहणीत आढळून येणारी वस्तुस्थिती

बाह्य स्त्रोत यंत्रणा निवड कार्यपध्दती	विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून वरील निकषांची पूर्तता करणाऱ्या प्राप्त प्रस्तावामधून गुणांकन पद्धतीने पात्र ठरणाऱ्या बाह्यस्त्रोत यंत्रणेची निवड करण्यात येईल.
अंमलबजावणी कार्यपध्दती	१) विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन पात्रताधारक बाह्यस्त्रोत यंत्रणेची निवड करणे. २) सदर निवड झालेल्या यंत्रणेस कार्यारंभ आदेश देणे व त्यासमवेत करारनामा करणे. ३) निवड झालेल्या यंत्रणेकडून कार्यारंभ आदेशानुसार अपेक्षित संशोधन प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) प्राप्त करणे. ४) सदर सविस्तर प्रकल्प अहवालाची नियंत्रक यंत्रणेच्या कार्यालयातील संशोधन परिषदेमार्फत छाननी करून घेणे व त्यास मान्यता देणे. ५) मान्य सविस्तर प्रकल्प अहवालानुसार संबंधित सेवापुरवठादार बाह्यस्त्रोत यंत्रणेकडून अंमलबजावणी करून घेणे. ६) सदर सविस्तर प्रकल्प अहवालातील कार्यवाहीच्या टप्प्यानुसार झालेल्या कामकाजाचे स्थळपाहणीद्वारे परिक्षण करणे. ७) सदर परिक्षणानुसार झालेल्या कामकाजाचे मुल्यांकन करून टप्प्यानुसार अनुज्ञेय रक्कम अदायगी करणे. ८) सेवापुरवठादार बाह्यस्त्रोत यंत्रणेकडून आवश्यकतेनुसार साप्ताहिक/ पाक्षिक/ मासिक/ त्रैमासिक/सहामाही प्रगती अहवाल प्राप्त करण्यात येईल. त्यानुसार कामकाजाचा आढावा घेण्यात येईल व आवश्यक अनुपालन करुन घेण्यात येईल. ९) प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर विहीत नमून्यात प्रकल्पपूर्ती अहवाल, अनुषंगिक डाटाबेस सेवापुरवठादार बाह्यस्त्रोत यंत्रणेकडून प्राप्त करुन घेण्यात येईल. सदर अहवाल व माहितीची छाननी करून अंतिम टप्प्याची अनुज्ञेय रक्कम अदायगी करण्यात येईल.
कालावधी मर्यादा:	एक वर्ष
संनियंत्रण	१. त्रैमासिक अहवाल प्राप्ती व आढावा २. संशोधन परिषदेतील अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष क्षेत्रभेट व त्यानुसार अनुपालन ३. झालेल्या कामकाजाची नियमित तपासणी व सुधारणा

अपेक्षित खर्च

७० लाख रुपये

नियमक मंडळाची तत्वत: मान्यता रक्कम	अ.क्र.	बाब	अपेक्षित खर्च (रुपये)
१	२	३	४
७००००००	१	संशोधन कर्मचारी: पूर्णवेळ/अर्धवेळ/बाह्य सेवा (Hired services) एकूण मान्य रक्कमेच्या ४५% पेक्षा जास्त नाही	३१५००००
	२	क्षेत्रीय कार्य (Field work) ३५% पेक्षा जास्त नाही	२४५००००
	३	संशोधन उपकरणे आणि अभ्यास साहित्य (संगणक, प्रिंटर इ.) १०% पेक्षा जास्त नाही	७०००००
	४	आकस्मिक खर्च (Contingency) ५% पेक्षा जास्त नाही	३५०००००
	५	प्रकाशन/कार्यशाळा/चर्चासत्र * प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार TRTI,Pune द्वारे हे निश्चित केले जाईल. अंदाजे ५%	३५०००००
		एकुण	**७०,००००० **

निधीस्त्रोत

ठोक अनुदान (Corpus Fund)

निधी अदायगी टप्पे

बाह्यस्त्रोत यंत्रणेस पुढील टप्पेनिहाय कामाच्या प्रगती नुसार अनुज्ञेय रक्कम अदा करण्यात येईल.

नियमक मंडळाची तत्वत: मान्यता रक्कम	अ.क्र.	बाब	अपेक्षित खर्च (रुपये
१	२	३	४
७००००००	1	प्रस्ताव मान्यतेनंतर ५ टक्के,	३५०००००
	2	माहिती संकलन १० टक्के,	७०००००
	3	प्राप्त माहिती छाननी व डाटा एन्ट्री १५ टक्के,	१०५०००००
	4	माहितीचे पृथक्करण १५ टक्के,	१०५०००००
	5	अहवाल लेखन १० टक्के,	७०००००
	6	प्रारूप अहवाल सादरीकरण १५ टक्के,	१०५०००००
	7	प्रारूप अहवाल मान्यतेनंतर छपाई केलेला अहवाल प्रुफ रीडिंगसाठी सादरीकरण १५ टक्के,	१०५०००००
	8	प्रकल्पपूर्ती अहवाल १५ टक्के,	१०५०००००
		एकुण	**७०,००००० **

मध्यावधी आढावा	१ प्रकल्प अंमलबजावणी सुरु झाल्यानंतर अंमलबजावणीचा विहित नमुन्यात मासिक खर्च व अंमलबजावणी प्रगती अहवाल प्राप्त करण्यात येईल. त्यानुसार दरमहा संबंधितात आवश्यक लेखी सूचना निर्गमित करण्यात येतील व त्याप्रमाणे अनुपालन करून घेण्यात येईल. २ संशोधन परिषदे मार्फत प्रकल्पाचा मध्यावधी आढावा घेवून एकंदरीत कामकाजाचे मूल्यमापन करण्यात येईल. त्यानुसार अंमलबजावणीत आवश्यक सुधारणा करून उर्वरित अंमलबजावणी पूर्ण करून घेण्यात येईल. ३ अंमलबजावणी यंत्रणा कार्यारंभ आदेश, करारनाम्यानुसार कार्यवाही करत नसल्यास मान्यता काढून घेणे, वसुली लावणे वा वित्तीय नियमावलीनुसार उचित दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.
प्रकल्पपूर्ती अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र	विहित नमुन्यात सर्व समवेशक प्रकल्पपूर्ती अहवाल, खर्चाच्या सविस्तर तपशीलासह उपयोगीता प्रमाणपत्र प्राप्त करण्यात येईल, तसेच प्रकल्पपूर्ती अहवालाची छाननी करून अंतिम करून घेण्यात येईल.
फलनिष्पत्ती	१ आदिवासी महिलांच्या समस्यांचे वस्तुनिष्ठ निदान आणि गरजांचे प्राधान्यक्रम निश्चित होणे. २ आदिवासी महिलांच्या विद्यमान सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व लोकसंख्याशास्त्रीय अभ्यासावरून त्यांच्या विकासाची सद्यस्थिती स्पष्ट होणे. ३ शासकीय योजना लाभाचा विनियोग आणि योजनांच्या/लाभाच्या परिणामकारकतेचा सकारात्मक व नकारात्मक बोध होणे. ४ आदिवासी महिलांचे शिक्षण, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास, आर्थिक सक्षमीकरणासाठी मॉडेल विकसित करता येणे. ५ आदिवासी महिलांच्या विकासासाठी अल्पकालीन, मध्यमकालीन व दीर्घकालीन धोरणात्मक शिफारसी उपलब्ध होणे. ६ राज्याच्या महिला धोरणाचे अनुपालन होणे.

(निलेश सागर, भा.प्र.से.)
आयुक्त
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे